आज़ादी का अमृत महोत्सव

# महिला नेतृत्व विकास

संपादक

**डॉ. प्रकर्ष सुभाषराव देशमुख**



# महिला नेतृत्व विकास

संपादक

**डॉ. प्रकर्ष सुभाषराव देशमुख**
सहयोगी प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख,
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय चाकूर,
ता. चाकूर जि. लातूर

प्रथमावृत्ती, मार्च 2022


© लेखकाधीन

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)


प्रकाशक

**डॉ. उमाकांत जाधव**
आदित्य प्रकाशन,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर-413512

अक्षरजुळणी व मुद्रण

**मे. प्रिंटलाइन इंडस्ट्रीज,** बाभळगाव, लातूर-413531

**ISBN - 978-93-83109-98-2**

**स्वागतमूल्य : रु. 215/-**



*(इस संपादित ग्रंथ में बताए गए तथ्यों, व्यक्त विचारों, निष्कर्षों और साहित्यिक चोरी, यदि कोई हो, उसकी जिम्मेदारी पूरी तरह से संबंधित लेखों के लेखक की है। प्रकाशक या संपादक उनके लिए कोई जिम्मेदारी नहीं लेते हैं।)*
या संपादित ग्रंथामध्ये नमूद केलेली वस्तुस्थिती, व्यक्त केलेली मते,विषयाची मांडणी,निष्कर्ष, घेण्यात आलेले संदर्भ आणि वापरण्यात आलेले साहित्य, यांची जबाबदारी संपूर्णपणे संबंधित लेखांच्या लेखकाची आहे. प्रकाशक किंवा संपादक त्यांच्यासाठी कोणतीही जबाबदारी घेत नाहीत.


9 789383 109982

"मानवता की प्रगति महिलाओं के सशक्तिकरण के बिना अधूरी है। आज मुद्दा महिलाओं के विकास का नहीं, बल्कि महिलाओं के नेतृत्व वाले विकास का है।"
– नरेंद्र मोदी (पंतप्रधान)

## संपादकीय...

भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष आणि आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून **"महिला नेतृत्व विकास"** या शीर्षकाचा ग्रंथ संपादित करीत असताना मला मनस्वी आनंद होत आहे. 2022 या वर्षी भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत आहेत व 8 मार्च हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय महिला दिन' म्हणून साजरा केला जातो आहे. राष्ट्रीय, वांशिक, भाषिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा विविधतेची पर्वा न करता सर्व महिलांचा, त्यांच्या कर्तृत्वाचा आणि आपले अस्तित्व सिद्ध करण्याकरिता त्यांच्याकडून केल्या गेलेल्या संघर्षाचा सन्मान व गौरव करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे. राष्ट्रउभारणीत भारतीय महिलांनी दिलेले भरीव योगदान लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहामध्ये साजरा करणे महत्त्वाचे आहे. कारण संपूर्ण मानवी समाज आणि सभ्यतेचा विकास महिलांमुळेच झाला आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरणाचे पुढचे पाऊल म्हणून महिलांचे नेतृत्वाखाली विकासाला गती देणे देखील तेवढेच गरजेचे आहे.

स्त्री-पुरुष यांच्यातील सहजीवन हे मानवी समाजजीवनाचा मूलाधार आहे. या दोन्हींशिवाय समाजाची कल्पना देखील करता येत नाही; परंतु पुरुषप्रधान संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे स्त्रीजीवनावर अनेक बंधने लादली गेली व त्यातून सबंध स्त्रीजीवन विविध प्रकारच्या समस्यांनी व्यापून गेले व स्त्रीचे अस्तित्व धोक्यात आले. आपले अस्तित्व टिकवण्यासाठी स्त्रियांकडून विविध प्रकारचे लढे उभारले गेले. त्यातूनच स्त्रीसक्षमीकरणाचा विचार पुढे आला. अशा या स्त्रीसक्षमीकरणाच्या प्रयत्नातून जागतिक पातळीवर स्त्रियांना आपले अस्तित्व निर्माण करून स्वतःला सिद्ध करण्यासाठी फार मोठा संघर्ष करावा लागला . भारतात देखील प्राचीन काळात अनेक महिलांनी आपल्यामध्ये नेतृत्व गुण असल्याचे सिद्ध केले; पण पुरुषप्रधान संस्कृतीच्या प्रभावामुळे त्यांना हवी तेवढी प्रसिद्धी मिळाली नाही. असे असले तरी भारताच्या इतिहासाला अशा नेतृत्वगुणसंपन्न महिलांची दखल घ्यावी लागलीच. सध्याच्या काळात देखील प्रतिकूल व असुरक्षित परिस्थितीत भारतीय महिला राजकारण, अर्थकारण, समाजकारण, व्यवसाय, क्रीडा, कृषी, संरक्षण

माझे आई-वडील सौ. सुमन सुभाषराव देशमुख आणि प्रा. सुभाष दगडूसाहेब देशमुख (कदम) यांच्या आशीर्वाद आणि प्रेमाशिवाय हे पुस्तक पूर्ण होऊ शकले नसते, याबद्दल मी त्यांना अभिवादन करतो. माझ्या कामाच्या अनियमित वेळापत्रकांचा सामना करण्यासाठी मी माझी पत्नी सौ. धनश्री प्रकर्षराव देशमुख आणि माझ्या लाडक्या मुली आर्या आणि तेजस्विनी यांचे मनापासून कृतज्ञता व्यक्त करण्याची ही संधी घेतो आहे.

हे संपादित पुस्तक विद्वान लेखकांनी त्यांच्या बहुमोल संशोधनकार्यातून योगदान दिल्याशिवाय शक्यच झाले नसते. माझ्या विनंतीला उदारपणे प्रतिसाद देणाऱ्या त्यांच्या योगदानाबद्दल मी त्या प्रत्येकाचा ऋणी आहे. ते माझ्या शक्तीचा आधारस्तंभ आहेत. त्यांच्या प्रेरणा आणि पाठिंब्याशिवाय मी हे पुस्तक पूर्ण करू शकलो नसतो.

शेवटी मी श्री. राजेश जे. तगडपल्लेवार, डॉ. श्याम टी. जाधव, डॉ. भानुदास डी. पवार यांनी माझ्या सर्व प्रयत्नांना नेहमीच साथ दिली. या कार्यात मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करणारे माझे सर्व महाविद्यालयातील सहकारी, मित्रपरिवार, विद्यार्थी आणि नातेवाईक यांचे मी मनःपूर्वक आभार मानू इच्छितो. मुद्रक, प्रकाशक यांचेही मनापासून आभार मानतो आणि अशी आशा व्यक्त करतो की, या ग्रंथाचे शैक्षणिक समुदायाकडून स्वागत होईल आणि संशोधक, धोरणकर्ते आणि महिला अभ्यासाशी संबंधित संस्थांना ते उपयुक्त वाटेल.

धन्यवाद!

संपादक
**डॉ. प्रकर्ष सुभाषराव देशमुख**

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शीर्षक / लेखक का नाम | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| 1. | **भारतीय राष्ट्रीय आन्दोलन में महिलाओं की भूमिका**<br>डॉ० नरेश सिंह | 31-37 |
| 2. | **उद्यमिता एवं महिला नेतृत्व विकास**<br>मनीष पटेल | 38-41 |
| 3. | **सशक्त महिला बनाम सुदृढ़ राष्ट्र**<br>डॉ. विभा | 42-48 |
| 4. | **संवैधानिक उपचार : महिला उत्पीडन के संदर्भ में**<br>डॉ. शैलेश यादव, डॉ. पी.के. स्टालिन | 49-53 |
| 5. | **भारतीय समाज उत्थान में नारी**<br>प्रो. कॅप्टन डॉ. शिंदे अनिता मधुकर | 54-58 |
| 6. | **भारतीय शिक्षा के विकास में महिलाओं का योगदान**<br>नीलम सुमन, डॉ. संगीता चौहान | 59-66 |
| 7. | **नारी शिक्षा समाज का आभुषण**<br>डॉ.जयश्री भास्कर वाडेकर | 67-71 |
| 8. | **महिला नेतृत्व विकास - परिवर्तनकारी भारत**<br>डॉ. संगीता चौहान. दुर्गा कुमारी गोंड | 72-78 |
| 9. | **महिला नेतृत्व और विकास**<br>डॉ कृष्णा कदम | 79-82 |
| 10. | **बदलते भारत में महिलाओं का योगदान**<br>प्रा. डॉ.सुनिता मधुकरराव शिंदे | 83-87 |
| 11. | **महिला नेतृत्व विकास व सक्षमीकरणामध्ये शासनसंस्थेची भूमिका**<br>युवराज महालिंगे | 88-94 |
| 12. | **महिला सक्षमीकरणात / विकासात बचतगटाची भूमिका**<br>डॉ सुनिता आत्माराम टेंगसे | 95-100 |
| 13. | **महिला विकासाचे विविध टप्पे व भारतातील महिलांचा राजकीय सहभाग**<br>डॉ. आशा नरसिंगराव गिते | 101-109 |

"सामाजिक स्वास्थ्यासाठी दबावगट निर्माण करण्यासाठी महिलांना या बचतगटाचा अस्त्रासारखा वापर नक्कीच करता येईल."

12

# महिला सक्षमीकरणात / विकासात बचतगटाची भूमिका

**डॉ सुनिता आत्माराम टेंगसे**

एम.ए. (समाजशास्त्र) पीएच.डी.

*"डॉ.सुनिता आत्माराम टेंगसे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ, जिल्हा परभणी येथे १९९८पासुन कार्यरत आहे .स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे समाजशास्त्र अभ्यास मंडळ सदस्य म्हणून कार्य केले आहे. नांदेड विद्यापीठाच्या समाजशास्त्राच्या संशोधक मार्गदर्शक असुन,दोन संशोधक विद्यार्थ्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी.पदवी प्रदान केली आहे आणि दोन संशोधक विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य प्रगतीपथावर आहे. UGC कडून ट्राव्हल ग्रँट्सला मंजूरी मिळाली आहे.नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्या आणि नोकरी करणाऱ्या महिला आणि भारतीय मानसिकता या 02 पुस्तकांचे लेखन केले आहे.विविध सामाजिक आशयाच्या 11 पुस्तकांचे संपादन केले आहे, विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात 50 पेक्षा अधिक शोध निबंधाचे वाचन व प्रकाशन, विविध राष्ट्रीय चर्चासत्रे,वर्कशॉप मध्ये रिसोर्स पर्सन म्हणून मार्गदर्शन केले आहे. रोटरी क्लब सोनपेठ कडून गुरू गौरव पुरस्कार, पंजाबराव देशमुख आदर्श शिक्षक पुरस्कार, वरपुडकर महाविद्यालयाचा आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. विविध काव्यवाचन कार्यक्रमात सहभाग तसेच लवकरच काव्यसंग्रह प्रकाशीत केला जाणार आहे.*

**गोषवारा :** स्वयं-सहायत्ता गट (SHGs) ही लोकांच्या अनौपचारिक संघटना असून त्यांच्या राहणीमानात सुधारणा करण्याचे मार्ग शोधण्यासाठी एकत्रित येऊन तयार करण्यात आल्या आहेत.समान सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या आणि एकत्रितपणे सामान्य उद्देश पूर्ण करण्याची इच्छा असलेल्या महिलां एकत्र येऊन बचतगट तयार करतात .भारतातील गावा गावांत गरिबी, निरक्षरता, कौशल्याचा अभाव, औपचारिक कर्जाचा अभाव इत्यादींशी संबंधित असंख्य समस्या भेडसावत आहेत. या समस्या वैयक्तिक पातळीवर सोडवता येत नाहीत आणि त्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.अशा परिस्थितीत बचत गट गरीब आणि उपेक्षित लोकांसाठी परिवर्तनाचे साधन बनत आहेत. स्वयंरोजगार आणि दारिद्र्य निर्मूलनाला प्रोत्साहन देण्यासाठी SHG "स्वयंमदत" च्या कल्पनेवर अवलंबून आहे.याद्वारे रोजगाराच्या क्षेत्रात गरीब आणि उपेक्षित लोकांची कार्यक्षमता तयार करण्याचा प्रयत्न केला जातो आणि उत्पन्न निर्मिती उपक्रमहे सामूहिक नेतृत्व आणि परस्पर चर्चेद्वारे संघर्षांचे निराकरण केले जाते. हे सर्व सभासदसामूहिक हमी प्रणाली म्हणून काम करता. आपली बचत गोळा करून बँकांमध्ये ठेवतात. परिणामी, स्वयं-मदत गट सर्वात प्रभावी यंत्रणा म्हणून उदयास आले आहेत.या द्वारेस्वयंरोजगारा ,आर्थिक स्वातंत्र्यामध्ये सुधारित साक्षरता पातळी, उत्तम आरोग्य सेवा आणि अगदी चांगले कुटुंब नियोजन यासारख्या अनेक बाबतीत माहिती घेतली जाते व ती प्रसारित केली जाते.सामाजिक एकात्मतेतुन हुंडा, दारूबंदी इत्यादी प्रथांचा सामना करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांना प्रोत्साहन देतात.महिलांना सक्षम बनवतात आणि त्यांच्यामध्ये नेतृत्व कौशल्य विकसित करतात. सशक्त महिला ग्रामसभा आणि निवडणुकांमध्ये अधिक सक्रिय सहभाग घेतात.आपल्या देशात तसेच इतरत्रही असे पुरावे आहेत की स्वयं-सहायता गटांच्या निर्मितीचा समाजात तसेच कुटुंबातील महिलांचा दर्जा सुधारण्यासाठी गुणात्मक प्रभाव पडत आहे. ज्यामुळे त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारते आणि त्यांचा स्वाभिमान देखील वाढतो आहे. तसेच या गटांमार्फत हुंडा, मद्यविकार, उघड्यावर शौचास जाण्याचा धोका, प्राथमिक आरोग्य सेवा शिक्षण, अंधश्रद्धा, जनजागृतीचे कार्यक्रम इत्यादी कामे केली जातात.हे गटपर्यायी रोजगाराचे स्त्रोत आहेत हे सूक्ष्म-उद्योग स्थापन करण्यात मदत देऊन शेतीवरील अवलंबित्व कमी करते उदा.वैयक्तिकृत टेलरिंग, किराणा दुकान, पापड उद्योग, पिठाची गिरणी, मीरची कांडप यंत्र सामूहिक शेती आणि टूल दुरुस्तीची दुकाने यासारखे व्यवसाय महिला सामूहिक पुणे करता आहेत.या बचत गटाच्या द्वारे महिला सक्षमीकरण वेग मिळाला आहे.

**संकल्पना:** महिला बचत गट, सिमुहीक उद्योग, महिला नेतृत्व, निर्णय क्षमता विकास इ.

महिला बचत गटांच्या माध्यमातून पुढील तत्त्वांची जोपासनाही गटातील महिलांनी केलीच पाहिजे.

बचत गटाचा व्यवहार प्रामाणिकपणे व लोकशाही तत्त्वावर आधारित चालवणे, गटामध्ये सर्व महिलांनी सक्रिय सहभाग घेणे, (वेळेवर सभा घेणे, सभेत विषय मांडणे, त्यावर चर्चा करणे, इतिवृत्तांत लिहिणे, हिशेबाच्या वह्या व्यवस्थित ठेवणे, गटांच्या नियमांची गटाने घेतलेल्या निर्णयाचे मनापासून पालन करणे हे प्रत्येक महिला आपले कर्तव्य समजते आहे.

**बचत गटाची भूमिका:**

महिला बचत गटांची स्थापना हा महिलांच्या सक्षमीकरणाच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा आहे. ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाची प्रगती करण्यासाठी किंवा त्यांचे उत्पन्न आहे अशा सर्वांसाठी एकत्र येऊन बचत गटाच्या माध्यमातून प्रगती करणे हा एक उत्तम राजमार्ग प्रस्थापित केला आहे. बचतगटा द्वारे प्रगती होत आहे. बचत गटाच्या भूमिकेविषयी जानुन घेताना असे म्हणता येईल की वास्तविक बचत करणे हा महिलांचा स्थायीभाव आहे. रुपयातले दोन पैसे कसे वाचवायचे हे महिलांकडून शिकावे असे म्हटले जाते ते शंभर टक्के खरी आहे.कोणत्याही वस्तूच्या खरेदीबाबत महिला जास्तीत जास्त चिकित्सकपणे विचार करून मगच निर्णय घेतात.

याबरोबरच गटाच्या स्थापनेचा उद्देश म्हणजे स्वयंम सहाय्यता होय. स्वतःला मदत करणे आपल्यावर आलेल्या संकटाला तोंड देताना दुसऱ्याकडे हात पुढे करण्याचा प्रसंग आपल्यावर येऊ नये किंवा दुसऱ्याकडे याचना करावी लागू नये म्हणून आपणच आपली मदत कशी करावी हे बचत गटांमुळे शक्य होते. आपल्या जमा रकमेतून आपल्या सभासदांना पैशाची गरज भासल्यास जसे की दवाखाना, लग्न, शिक्षण, बांधकाम अशा वेळी तातडीच्या मदतीची आवश्यक असते अशा प्रसंगी बचत गटाचे महत्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे केवळ बचत करणे व कर्ज वाटणे एवढया पुरतीच बचत गटांच्या कार्याची व्याप्ती नाही. त्या बरोबरच बचत गटांच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्न, विषयांबाबत चर्चा होणे आवश्यक आहे व त्यासाठी बचत गटामार्फत सामूहिकपणे काही कृती होणे गरजेचे आहे.

**बचत गटातील महिलांना दिले जाणारे प्रशिक्षणे :**

महाराष्ट्रातील स्वयंसहायता बचत गट प्रशिक्षण व शिक्षण देण्यासाठी अनेक संस्था वा केंद्रांची स्थापना केली आहे .ज्याद्वारे महाराष्ट्रात उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम, स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम, पंतप्रधान रोजगार योजना अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम, उद्योजकता परिचय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यक्रम, महाराष्ट्र व्यवसाय मार्गदर्शन केंद्र, प्रधानमंत्री



कौशल्य विकास योजना व साक्षरता अभियान, उद्योजकता विकास कार्यक्रम इत्यादींचा समावेश होतो. समाज कल्याण प्रशासनात स्वयंसहाय्यता महिला समूहाचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे आढळून येते.

**सक्षम बचत गट म्हणजे:**

ग्रामीण भागात स्वयंसाहाय्यता बचत गट ही एक चळवळ म्हणून पुढे येत आहे. ग्रामीण भागात महिलांचा सक्रिय सहभाग आहे गावोगावी स्वयंसहाय्यता बचत गटाची चळवळ जोमाने वाढत आहे बचत गटामुळे बचत संकलनाच्या कामाला चालना मिळत आहे. पतनिर्मिती द्वारे रोजगार निर्माण होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होत आहे. हे सर्व प्राप्त करण्यासाठी त्यां गटा मध्ये नियमितते बरोबरच सभासदांची शंभर टक्के उपस्थिती व बैठकीच्या कामकाजातील सक्रिय सहभाग हे गटाच्या कार्यक्षमतेच्या दृष्टीने आवश्यक असते. सामुदायिक पातळीवरील चर्चा व लोकशाही पद्धतीने घेतलेले निर्णय यामुळे बचत गटाच्या कार्याला अधिक बळ प्राप्त होत आहे. परिणामीगटाचे व्यवहार पारदर्शक होऊन परस्परांवरील विश्वास अबाधित करण्यास पूरक ठरत आहेत. बचत गटाची सभा ही आपल्यातील सुप्त नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी मोठी संधी आहे, असे मानून प्रत्येक सभासदाने बैठकीची पूर्वतयारी, विषय पत्रिका लिहिणे, पासबुक भरणे, सभेचे संचालन करणे, बँकेचे व्यवहार पाहणे ती प्रत्येक महिलेने आळीपाळीने केले तर त्यांच्यातील व्यवस्थापन कौशल्य व निर्णय क्षमता विकसित होण्यास निश्चितच मदत होईल.

**निष्कर्ष:**

संपूर्ण देशभरात बचत गटाद्वारे वेगवेगळे व्यवसाय केले जातात आणि त्याद्वारे आपला आर्थिक आणि सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी महिला प्रयत्नशील असतात.यासाठी महिला वेगवेगळे व्यवसाय करतात जसे की पापड मशीन, पिठाची गिरणी, चटणी कांडप मशिन, शेती व पशुपालन,शेती व कुटीर उद्योग, कम्प्युटर सेंटर, रेशीम उद्योग, शिलाई मशीन, ब्युटी पार्लर, मोबाईल शॉपी, पत्रावळी तयार करणे, बेकरी, विणकाम, स्वच्छता सेवा, उन्हाळी कामे, किराणा दुकान, ई-सेवाकेंद्र, शेतीपूरक बी बियाणे आणि खते, यासारख्या अनेक व्यवसाय स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून महिला सद्यस्थितीत करत असलेले दिसून येतात. बचत गटांना बँकेने दिलेल्या कर्जामुळे बराच फायदा होत आहे, महिला विकासासाठी बचत गटाच्या माध्यमातून घेतलेला निर्णय महिलांसाठी एक सुवर्णसंधी बनला आहे यात तिळमात्र शंका नाही.

**संदर्भसूची:**


1. प्रा. पांडुरंग मोठे, संपादक, महिला सक्षमीकरण स्वरूप आणि विकास प्रकाशन लातूर, 2016 ,पान.न.352,353,356
2. प्रा.एम यु. मुलांनी, महिला स्वयंसहाय्यता बचत गट, डायमंड पब्लिकेशन्स पुणे पान.न.58,59
3. Prof. Gaikwad ,Human right and social justice edited book, 2013, page no.161
4. Mr. Ishwar Rathod, women empowerment challenges and solutions, edited book,2018, page no 151
5. Dr Mandakini Deshmukh, Role of human right in women empowerment, edited book ,ArunaPrakashan, Latur 2012,Page no.262.
6. https://www.agrimoderntech.in/2020/04/mahila-arthik-vikasat-shg.html
7. https://prahaar.in/%E0%A4%AE%E0%A4%B9%E0%A4.


❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani